राज्यातील पदक प्राप्त खेळाडू व त्यांच्या मार्गदर्शकांना रोख पारितोषिक देऊन गौरविण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

शासन निर्णय क्रमांक संकीर्ण १७१८/प्र.क्र.१७७/क्रीयुसे -२

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
तारीख : २८ फेब्रुवारी,२०१९.

वाचा:

१. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक : राक्रीधो २०१२ /प्र.क्र १५८/क्रीयुसे-२; दि.०५.०२.२०१४.

२. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक : राक्रीधो २०१८ /प्र.क्र १०३/क्रीयुसे-२; दि.११.१०.२०१८.

प्रस्तावना-

संदर्भाधीन क्र.१ व २ च्या शासन निर्णयान्वये ऑलिंपिक,राष्ट्रकूल व आशियाई स्पर्धामधील पदक विजेत्या खेळाडूंना रोख पारितोषिके देवून गौरविण्याची योजना कार्यन्वित आहे. जकार्ता, इंडोनेशिया येथे पार पडलेल्या पॅरा एशियन स्पर्धा २०१८ मध्ये पदक प्राप्त खेळाडूंना व त्यांच्या मार्गदर्शक यांना रोख पारितोषिक देण्यास मा. मुख्यमंत्री महोदयानी मान्यता दिली आहे. तसेच शासन योजनेच्या अनुषंगाने रोख पारितोषिक मिळण्याबाबत आंतर राष्ट्रीय पदक प्राप्त खेळाडूंनी केलेले अर्ज संचालनालयाने शासनास सादर केले आहे. सदर खेळाडू व त्यांच्या मार्गदर्शक यांना रोख पारितोषिक देऊन गौरविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

आंतर राष्ट्रीय स्तरावर पदक प्राप्त खेळाडू व त्यांच्या मार्गदर्शकांना त्यांच्या नावासमोर दर्शविलेली रक्कम रोख पारितोषिक म्हणून मंजूर करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे:-

अ. क्र.	खेळाडूचे नाव	खेळ प्रकार	स्पर्धा	प्राप्त पदक	पारितोषिक रक्कम (रूपये लाखात)	
					खेळाडू	मार्गदर्शक
१.	श्री. शाहु माने	शुटींग	युथ ऑलिम्पिक गेम्स २०१८ अर्जेंटीना	रौप्य पदक	२.००	०.५०
२.	श्री. सुकांत कदम	बॅडमिंटन	पॅरा एशियन गेम्स-२०१८ जकार्ता, इंडोनेशिया	कास्य पदक	१.००	०.२५
३.	श्री. मानसी जोशी	बॅडमिंटन	पॅरा एशियन गेम्स-२०१८ जकार्ता, इंडोनेशिया	कास्य पदक	१.००	०.२५

अ. क्र.	खेळाडूचे नाव	खेळ प्रकार	स्पर्धा	प्राप्त पदक	पारितोषिक रक्कम (रुपये लाखात)	
					खेळाडू	मार्गदर्शक
४.	श्री. सुयश जाधव	जलतरण	पॅरा एशियन गेम्स-२०१८ जकार्ता, इंडोनेशिया			
			५० मी. बटरफ्लाय	सुवर्ण पदक	३.००	०.७५
			२०० मी. वै. मिडले	कास्य पदक	१.००	०.२५
			५० मी. फ्रीस्टाईल	कास्य पदक	१.००	०.२५
५.	कु.मृणाली पांडे	बुद्धीबळ	पॅरा एशियन गेम्स-२०१८ जकार्ता, इंडोनेशिया			
			महिला सांघिक Rapid B२/B३	रौप्य पदक	२.००	०.५०
			महिला सांघिक Standard B२/B३	कास्य पदक	१.००	०.२५
६.	कु.तिजन पुनाराम गवार	बुद्धीबळ	पॅरा एशियन गेम्स-२०१८ जकार्ता, इंडोनेशिया			
			महिला सांघिक Rapid B२/B३	रौप्य पदक	२.००	०.५०
			महिला सांघिक Standard B२/B३	कास्य पदक	१.००	०.२५
७.	श्री. देविंदर वाल्मिकी	हॉकी	आशियाई चॅम्पियनशीप हॉकी स्पर्धा, २०१६ मलेशिया	सुवर्ण पदक	७.००	१.८७५
८.	श्री. उत्कर्ष काळे	कुस्ती	राष्ट्रकुल कुस्ती चॅम्पीयनशिप, २०१७ साऊथ अफ्रिका	सुवर्ण पदक	७.००	१.८७५
९.	कु. रुही शिंगाडे	बॅडमिंटन	पॅरा बॅडमिंटन वर्ल्ड चॅम्पीयनशिप, २०१५, इंग्लंड	कास्य पदक	१.००	०.२५
			पॅरा बॅडमिंटन वर्ल्ड चॅम्पीयनशिप, २०१७, कोरीया	कास्य पदक	१.००	०.२५
एकुण (रुपये एकोणचाळीस लाख फक्त)					**३१.००**	**०८.००**
					रु. ३९.०० लक्ष	

उपरोक्त नुसार एकूण रु. ३९.०० लक्ष (रुपये एकोणचाळीस लाख फक्त) इतकी रक्कम आयुक्त, क्रिडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अधिनस्त ठेवण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे

३. उपरोक्त बाबीकरीता होणारा खर्च "मागणी क्रमांक ई-३,२२०४- क्रीडा व युवक सेवा १०४ क्रीडा व खेळ (०९) खेळाडूंना शिष्यवृत्त्या व पुरस्कार (०९)(०६) ऑलिम्पिक, राष्ट्रकुल व आशियाई स्पर्धांमधील पदक विजेत्यांना रोख पारितोषिक देणे (२२०४ ५३२१)-५० इतर खर्च" या लेखाशीर्षाखालील अर्थसंकल्पित

तरतूदीमधून भागविण्यात यावा. सदरचे अनुदान ज्या प्रयोजनासाठी मंजूर करण्यात आले आहेत त्याच प्रयोजनासाठी खर्च करण्यात यावे.

४. वित्त विभागाच्या संदर्भाधिन दि.०२.०४.२०१८ व दि.२५.०१.२०१९ च्या परिपत्रकातील सूचनानूसार उपरोक्त तरतूद खर्च करण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी. यासाठी लेखाधिकारी, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना आंहरण व संवितरण अधिकारी तर आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौ.सं. क्र.१५६/२०१९/व्यय-५ ; दि.१३.०२.२०१९ अन्वये मिळालेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३०१११११८१५७८२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajendra Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education and Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=679184b88f7019ef64ad6ddc2495ca280267c0d4755ce63fa70c45cf755d9373, cn=Rajendra Shankarrao Pawar
Date: 2019.03.01 11:23:29 +05'30'

(राजेंद्र पवार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
२) मा. मंत्री (शालेय शिक्षण व क्रीडा) यांचे खाजगी सचिव.
३) मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक.
४) प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, पुणे.
६) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
७) महालेखापाल (लेखा व परिक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
८) वित्त विभाग (व्यय-५), मंत्रालय, मुंबई.
९) सर्व उपसंचालक, क्रीडा व युवकसेवा (संचालनालयामार्फत)
१०) सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी (संचालनालयामार्फत)
११) लेखाधिकारी, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे (संचालनालयामार्फत)
१२) वरिष्ठ कोषागार अधिकारी, पुणे. (संचालनालयामार्फत)
१३) निवडनस्ती, क्रीयुसे-२